# डॉ. नरेंद्र जाधव : परिचय (मराठी)

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, नामवंत शिक्षणतज्ज्ञ, देशी-विदेशी अग्रगण्य विद्यापीठांतील विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, सामाजिक बांधिलकीचा वसा घेतलेले प्रभावी वक्ते, मराठी-हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांतून तब्बल 41 पुस्तकांचे लेखन-संपादन करणारे सिध्दहस्त लेखक; तसेच एक प्रसन्न व प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून डॉ. नरेंद्र जाधव सर्वदूर सुपरिचित आहेत.

डॉ. नरेंद्र जाधव एप्रिल 2022 पर्यंत राज्यसभेचे राष्ट्रपती-नियुक्त खासदार म्हणून कार्यरत होते. सत्ताधारी पक्षाचे सदस्यत्व न स्वीकारता आपला स्वतंत्र बाणा त्यांनी कसोशीने जपला आहे. प्रत्यक्षात संसदेत तसेच विविध स्थायी समित्यांमध्ये (वित्त, व्यापार आणि माहिती-तंत्रज्ञान) आणि परराष्ट्र व्यवहाराच्या सल्लागार समिती मध्ये अभ्यासू आणि सक्रिय सहभागातून डॉ. नरेंद्र जाधव यांनी संसदपटू म्हणून आपला एक वेगळा मानदंड निर्माण केला आहे.

खासदारकी शिवाय अशोका युनिव्हर्सीटी सारख्या नावाजलेल्या विद्यापीठासह एकूण चार विद्यापीठात ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य करीत ते देशाच्या युवापिढीच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहेत. त्याच बरोबर, टाटा उद्योग समूहासह विविध कंपन्यांच्या संचालक मंडळावर 'स्वतंत्र संचालक' म्हणून देखील डॉ. जाधव कार्यरत आहेत. त्यांची ज्ञानसाधना आणि लेखनकार्य तर अखंडपणे निरंतर चालूच असते.

डॉ नरेंद्र जाधव सध्या 'भारतीय संविधान: समस्त भारतीयांचे गौरवस्थान' ('Indian Constitution: The Pride of Our Nation') या 61 तासांच्या वेबसिरीज महामालिकेवरचे काम पूर्णत्वाला नेण्यामध्ये व्यग्र आहेत.

इंग्लिश भाषेत तयार होत असलेल्या या अभूतपूर्व वेब-सिरीज मध्ये तब्बल 34 सर्वपक्षीय खासदार, 18 सुप्रिम कोर्ट व हायकोर्टाचे न्यायमूर्ती, 10 प्रख्यात कायदे पंडीत, आणि विविध विषयांचे 30 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय किर्तीचे तज्ज्ञ यांचा सहभाग आहे.

भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे ('आजादी का अमृत महोत्सव') हा योग साधून इंग्लिश आणि सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये ही वेबसिरीज 15 ऑगस्ट 2022 या

महन्मंगल दिनापासून प्रसारित करण्याचा डॉ जाधव यांचा मानस आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगभर ही महामालिका दाखविली जाणार आहे.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी गेली 47 वर्षे सार्वजनिक जीवनात अनेकानेक उच्चतम पदांना आपल्या कर्तृत्वाने नवीन झळाळी मिळवून दिली आहे. केंद्रीय नियोजन आयोग (अध्यक्ष : डॉ. मनमोहन सिंग) तसेच राष्ट्रीय सल्लागार परिषद (अध्यक्षा : श्रीमती सोनिया गांधी) या दोन भूतपूर्व शिखर संस्थांमध्ये केंद्रीय राज्य-मंत्री समकक्ष पातळीवरील सदस्य म्हणून देशाची 12 वी पंचवार्षिक योजना तयार करण्यात आणि एकूणच देशाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. तत्पूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि त्याही पूर्वी भारतीय रिझर्व बँकेचे प्रधान सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून देखील डॉ. नरेंद्र जाधव यांनी लक्षणीय कामगिरी बजावली आहे.

दलित समाजात जन्म आणि दारिद्र्य यांमधून येणा-या प्रतिकूल परिस्थितीवर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने निग्रहपूर्वक मात करत, (लहानपणी मुंबईच्या बकाल वस्तीत ‘दादा’ होण्याची महत्वकांक्षा बाळगणा--या) छोट्या नरेंद्रने बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून गरूड भरारी घेतली आणि आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत एक ‘दादा’ माणूस म्हणून आज त्यांची गणना होते. ओजस्वी व प्रासादिक वाणी, खळाळणारे चैतन्य, अखंड उर्जा आणि आपल्या सकारात्मक चिंतनातून प्रबोधन करणारे अभ्यासू वक्ते म्हणून डॉ. नरेंद्र जाधव यांना अमाप लोकप्रियता लाभली आहे. त्यांचा थक्क करणारा जीवनप्रवास अनेकांसाठी-विशेषत: तरूणाईसाठी - दीपस्तंभ ठरला आहे आणि अजूनही ठरतो आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी तर डॉ. नरेंद्र जाधव यांना आदर्श व्यक्तिमत्व (Role Model) म्हटले आहे.

मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए. ला प्रथमवर्ग मिळवणारे डॉ. नरेंद्र जाधव हे पहिलेच दलित विद्यार्थी. पुढे 1986 साली अमेरिकेच्या इंडियाना विद्यापीठातून, ‘सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी’ म्हणून विशेष बहुमानासह अर्थशास्त्रातील डॉक्टरेट. डॉक्टरेट करत असताना, अमेरिकेतील इंडियाना आणि डिपॉ या दोन विद्यापीठांत अध्यापन करून विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून गौरव

प्राप्त. अमेरिकेत डॉक्टरेट मिळाल्यानंतर अनेक संधी हात जोडून उभ्या असताना त्या डावलून मायभूमीचे ऋण फेडण्यासाठी एका आठवड्यातच भारतात परत.

स्टेट बँक ऑफ इंडियात अधिकारी म्हणून 1974 ते 1977 अशी तीन वर्षे आणि 1977 पासून रिझर्व बँकेत अर्थतज्ज्ञ म्हणून तब्बल 31 वर्षे नोकरी. रिझर्व बँकेचे प्रधान आर्थिक सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यकारी संचालकाच्या पदावरून स्वेच्छानिवृत्ती. भारतीय अर्थकारण आणि आर्थिक धोरणांच्या संदर्भात गेली कित्येक वर्षे महत्वपूर्ण योगदान. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) या जागतिक वित्तसंस्थेमध्ये साडेचार वर्षे आर्थिक सल्लागार म्हणून भारताचे प्रतिनिधित्व, त्याचप्रमाणे इथियोपिया व अफगाणिस्तान यांसारख्या मागास देशांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्बांधणी करण्यात महत्वपूर्ण कामगिरी.

डॉ. नरेंद्र जाधव शिक्षणक्षेत्राला सामाजिक परिवर्तनाचे तीर्थक्षेत्र मानतात म्हणूनच वर्षाकाठी सव्वा कोटी रूपयांच्या नोकरीचा त्याग करून (तब्बल 90 टक्के वेतनकपात स्वीकारून !) 2006 साली त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारले. तेथील त्यांची तीन वर्षांची कारकिर्द अत्यंत यशस्वी ठरली. समर्थ भारत अभियानाच्या माध्यमातून पुणे विद्यापीठ समाजाभिमुख करण्यात आणि पुणे विद्यापीठाला शिक्षण व संशोधनात जागतिक पातळीवर नेण्यात डॉ. नरेंद्र जाधवांचा सिंहाचा वाटा आहे.

डॉ. नरेंद्र जाधव यांचा मराठी, हिंदी आणि इंग्रजी लेखनाचा झपाटा विलक्षण म्हणावा लागेल. त्यांचे आर्थिक, सामाजिक आणि ललित विषयांवरचे एकूण 41 ग्रंथ आजवर प्रकाशित झाले आहेत त्याशिवाय 300 पेक्षा जास्त शोधनिबंध व स्फुट लेख, 31 महत्वपूर्ण शासकीय अहवाल आणि रिझर्व बँकेच्या अनेक गव्हर्नरांसाठी लिहिलेली 100 पेक्षा अधिक भाषणे असा त्यांचा लेखनाचा विस्तृत पट आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतून प्रकाशित (लिखित आणि संपादित) ग्रंथाची एकूण पृष्ठसंख्या होते सुमारे 15,000, (लिखित 7000 +, संपादित 8000 +).

मराठी साहित्यात एकजात सारे विक्रम मोडून काढणा-या ‘आमचा बाप आन् आम्ही’ या त्यांच्या पुस्तकाचा आजवर भारतीय आणि परदेशी अशा 15 भाषांमध्ये अनुवाद झाला असून, त्याच्या सुमारे सात लाखांहून अधिक प्रती जगभर विकल्या गेल्यामुळे हे पुस्तक मराठी भाषेतला चमत्कार मानले जाते. ‘सानेगुरूजींनी महाराष्ट्राला आदर्श आई दिली आणि डॉ. नरेंद्र जाधव यांनी महाराष्ट्राला दिला आदर्श बाप !’ अशा शब्दांत ज्येष्ठ कलावंत निळू फुले यांनी ह्या पुस्तकाचा गौरव केला होता. मराठी साहित्याच्या इतिहासातील सर्वाधिक लोकप्रिय आत्मकथन म्हणून गाजलेल्या या पुस्तकाच्या 200 पेक्षा जास्त आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत.

रवींद्रनाथ टागोर यांच्या दीडशेव्या जयंती वर्षात, 8 मे 2011 रोजी, डॉ. नरेंद्र जाधव यांनी संपादन-अनुवाद केलेली ‘रवींद्रनाथ टागोर : समग्र जीवनदर्शन’ ही ग्रंथत्रयी प्रकाशित झाली. त्यात आहे ‘भयशून्य चित्त जेथ’ हा रवींद्रनाथांच्या 151 कवितांचा भावानुवाद, ‘रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन’ हा संपादित ग्रंथ आणि ‘रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव’ हे गुरूदेवांचे मराठीतले पहिलेच विश्लेषणात्मक चरित्र. या तीन ग्रंथांनी प्रथमच मराठी वाचकाला रवींद्रनाथांची सर्वस्पर्शी ओळख करून दिली. या ग्रंथत्रयीला देखील चोखंदळ वाचकाचा उदंड प्रतिसाद लाभला. वर्षभरात चार आवृत्या निघाल्या !

डॉ. नरेंद्र जाधव यांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर आजवर एकूण 31 अहवाल केंद्रसरकार, राज्यसरकार आणि रिझर्व बँक यांना सादर केले आहेत. अलिकडच्या काळात डॉ. जाधवांनी लिहिलेले अनेक अहवाल महत्वपूर्ण ठरलेले आहेत. या संदर्भात ‘महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या’ संबंधीचा अहवाल, राष्ट्रीय कौशल्यविकास योजनेबद्दलचा अहवाल, ‘फॅक्टरीज ॲक्ट’ संबंधीचा अहवाल, अनुसूचित जाती-जमाती ‘सबप्लॅन’ बद्दलचा अहवाल, तसेच, भटक्या-विमुक्त जातीसंबधीचा अहवाल हे विशेष लक्षणीय आहेत. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष म्हणून दोन ऐतिहासिक महत्वाचे अहवाल त्यांनी 2012 साली केंद्र सरकारला सादर केले. ते म्हणजे 26 अलिपूर रोड या डॉ. आंबेडकरांच्या दिल्लीतील एके काळच्या निवासस्थानी डॉ. आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासंबंधीचा ‘मास्टर प्लॅन’ आणि नवी

दिल्लीत 15 जनपथ या मोक्याच्या ठिकाणी 'डॉ. बाबासाहेब आंबडकर इंटरनॅशनल सेंटर' या संस्थेची उभारणी करण्यासाठीचा मास्टर प्लॅन. या दोन्ही अहवालांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कार्यवाही पूर्ण केली असून या दोन्ही वास्तुंना आता तिर्थक्षेत्राचे स्वरूप आले आहे.

आजपर्यंत राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या तब्बल 72 पुरस्कारांनी डॉ. नरेंद्र जाधव सन्मानित झाले आहेत. त्यांतला अतिविशेष पुरस्कार म्हणजे 'कमांडर ऑफ अॅकेडेमिक पाल्मस' हा फ्रान्स सरकारचा शिक्षण क्षेत्रातला सर्वोच्च नागरी किताब, जो मिळवणारे डॉ. नरेंद्र जाधव हे पहिलेच भारतीय होत. नुकतेच त्यांना 'भारतभाग्य विधाता 2022' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारतातील चार राज्यांतील विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' किंवा D.Litt यांसारख्या मानद पदव्या प्रदान केल्या आहेत.

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 2005 साली आपल्या जाहीर भाषणात म्हटले होते : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन् यांच्याप्रमाणेच डॉ. नरेंद्र जाधव यांचे आयुष्य हीसुध्दा बदलाची, असीम शौर्याची, उत्कर्षाची आणि आशेची कहाणी आहे. यामधून आपल्या देशातील लाखो-करोडो लोकांना नवे, सुखासमाधानाचे जीवन जगण्यासाठी लढा देण्याचे स्फुरण मिळेल याची मला खात्री वाटते.'

डॉ. जाधवांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी पुढील वेबसाईटला भेट द्यावी: www.drnarendrajadhav.info

डॉ. जाधव फेसबुक आणि ट्विटर वर देखील उपलब्ध असतात.

डॉ. जाधव यांची भाषणे, मुलाखती, लॉकडॉऊनच्या कालखंडातील विशेष ई-संवाद तसेच संसदेतील त्यांच्या सक्रिय सहभागाचे 300+ Videos त्यांच्या विशेष You Tub चॅनेलवर उपलब्ध आहेत. त्यांच्या You Tube चॅनेलवरचे Videos पाहण्यासाठी: Go to http://YouTube.com/c/DrNarendraJadhavWorld and Click on Subscribe.